पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ६**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ८/५/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र. १०७**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/४/२०१८ ते दि.२२/४/२०१८ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/३८४ दि. २६/४/२०१८ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १०८**

मा.सौ.विजयालक्ष्मी हरिहर यांचे दि. २६/४/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.१८ अ मध्ये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक टिंबर मार्केट ग्रंथालय या ठिकाणी पुस्तके खरेदी करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, यादी क्र. जे १०, पान क्र. २५७, अ.क्र.४३९, शहरामध्ये पाण्याच्या नवीन लाईन विकसित करणे, प्रभाग क्र.१८ अ मधील ७८ गुरुवार पेठ पंचमुखी मारुती येथे फर्निचर करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.१८ अ मध्ये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक टिंबर मार्केट ग्रंथालय या ठिकाणी पुस्तके खरेदी करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. १०९**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, पुणे व मा.कु.हिमाली कांबळे यांचे दि. ३/५/२०१८ चे पत्र.

प्रबुध्द स्वयंरोजगार सहकारी संस्था व जनहितम स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था पुणे यांना नगर विकास व रोजगार व स्वयंरोजगार विभाग यांच्या शासन निर्णय २००२ व २०१५ नुसार रक्कम रूपये ३ लाखापर्यंतचे पुणे महानगरपालिका क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत निघणारी विविध प्रकारची कामे विना निविदा देणे व विविध सेवा घेणे तसेच स्वयंरोजगारच्या योजना चालविण्यसाठी जागा उपलब्ध करून देणे.

**विषय क्र. ११०**

मा.दिलिप बराटे, मा.राजाभाऊ बराटे, मा. सौ.स्मिता कोंढरे यांचे दि. ३/५/२०१८ चे पत्र.

महात्मा फुले मंडई शुक्रवार पेठ पुणे-२ येथील नविन मंडईच्या दक्षिणेकडील मंडई गणपती समोरील पडीक असलेली १२५ ते १५० चौ.फुटाची मुतारीची जागा अखिल मंडई मंडळास ऑफिससाठी भाडे कराराने देण्यात यावी.

**विषय क्र. १११**

मा.सौ.स्वाती लोखंडे व मा.सिध्दार्थ शिरोळे यांचे दि. ३/५/२०१८ चे पत्र.

क्रांतीवीर लहुजी साळवे यांची समाधी संगमवाडी, पुणे येथे १५० वर्षापासून असून लहुजी वस्ताद यांचे देशाप्रती असलेले कार्य जतन करण्यासाठी व त्यांचे स्मारक करण्यासाठी त्या ठिकाणी पुणे महानगरपालिकेच्या विकास आराखडयात स.नं.५१,५२,५४ मध्ये ५ एकर २० गुंठेचे आरक्षण कायम करण्यात आले आहे.

तरी तेथील भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर करून ५ एकर २० गुंठयामध्ये पोहोच रस्त्यासहित स्मारक करण्यात यावे.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ११२**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत येणाऱ्या कामांच्या माहे मार्च २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–१/३५ दि.२७/४/२०१८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ११३**

कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत महापालिका सेवकांना एक अपत्यावर कुटूंब नियोजन केल्या प्रित्यर्थ दोन जादा वेतनवाढी देणे ऐवजी रोख रक्कम स्वरुपात एकदाच बक्षिस (One time reward) देणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/१०४७ दि.२०/२/२०१८ चे पत्र.

१)मा.महापालिका सभेचे ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११ अन्वये प्राप्त मंजुरीनुसार संबंधित महानगरपालिका अधिकारी/सेवकांना देण्यात आलेल्या वेतनवाढी रद्द करणेस, त्यानुसार वेतन फेरनिश्चितीकरण व आवश्यक ती कार्यवाही करणेस

२) पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडे मा.स्थायी समितीचे मंजुरीने लाडकी लेक दत्तक योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये एका मुलीवर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास र.रुपये ५० हजार पर्यंत राष्ट्रीयकृत बँकेत मुलीच्या नावे गुंतविण्यात येतात. त्या योजनेप्रमाणे कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत पुणे महापालिका अधिकारी/सेवकांनी एका अपत्यावर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया केल्याप्रित्यर्थ दोन जादा वेतनवाढी देणेऐवजी, संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना र.रुपये ५० हजार एकदाच बक्षिस (One time reward) स्वरुपात दि. १८/१२/१९९८ पासून मा.महापालिका सभा ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११ चे मंजुरीमधील अट क्र. २ व ४ च्या अधीन देणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.२४/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ११४**

अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेअंतर्गत सभासदत्व घेतलेल्या वर्ग १ ते ४ संवर्गातील सर्व पदांवरील म.न.पा. सेवकांचे वेतनामधून मासिक सी.एच.एस.वर्गणी(मूळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता) या बेरजेच्या १% ऐवजी ४% नुसार कपात करणेस आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतनामधून मासिक सी.एच.एस. वर्गणी (मूळ निवृत्ती वेतन+महागाई भत्ता) या बेरजेच्या १% ऐवजी ४% नुसार कपात करणेस, व त्यानुसार कार्यवाही करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/९७४ दि.५/२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.२४/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ११५**

शहरी गरीब वैद्यकीय सहाय योने अंतर्गत पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटलीमधील अंर्तरुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारांसाठी ,सी.जी.एस.मान्य दराने,५०% हमी पत्रांतर्गत रक्कम रुपये एक लाख या कमाल मर्यादेऐवजी १००% वाढीने रक्कम रुपये दोन लाख या कमाल मर्यादेपर्यंत आर्थिक लाभ मिळणेसाठी चालू आर्थिक वर्षातील शहरी गरीब वैदयकीय सहाय योजनेसाठी मान्य तरतूद रक्कम रूपये २५,००,००,०००/– (अक्षरी–रक्कम रुपये पंचवीस कोटी फक्त) असून (१) सदयस्थितीत योजने अंतर्गत सभासदत्व घेण्यासाठी प्रतिवर्षी वाढत जाणारी लाभार्थींची संख्या (२) एका आर्थिक वर्षात कुटूंबातील एका सदस्यास अथवा एका पेक्षा जास्त सदस्यांस मिळून रक्कम रुपये १,००,०००/– पेक्षा जास्त होणारा वैदयकीय उपचार औषधोपचारांचा खर्च (३) रुग्णांचे गंभीर आजारांवरील प्रदीर्घ कालावधी साठी चालू असलेल खर्चीक वैदयकीय उपचार व महागडया औषधोपचारांची रक्कम हॉस्पिटल प्रशासनास अदा करणेसाठी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील रुग्णांची असमर्थता या सर्व कारणांस्तव पुढील आर्थिक वर्षापासून सदर योजनेच्या तरतूदीमध्ये प्रमाणबध्द अथवा दुपटीने वाढ केल्यासच योजनेच्या प्रत्येक सभासद कुटूंबांना, एका आर्थिक वर्षासाठी, पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटल्स मधील अंर्तरुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारांसाठी सी.जी.एच.एस.मान्य दराने ५०% हमी पत्रांतर्गत रक्कम रुपये १,००,०००/–(अक्षरी–रक्कम रुपये एक लाख) या कमाल मर्यादे ऐवजी रक्कम रुपये २,००,०००/–(अक्षरी–रक्कम रुपये दोन लाख) या कमाल मर्यादेपर्यंत आर्थिक लाभ देण्याबाबत मा. योगेश समेळ व मा.संदिप जऱ्हाड यांचे दि.२१.११.२०१७ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.१५२,दि. २२.११.२०१७ ला

अनुसरुन मा.प्र.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र. मआ/ आरोग्य/ ११४७, दि.७.३.२०१८ ने पाठविलेला अभिप्रायास अनुसरुन झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.२१४, दि. १७/३/२०१८ चा विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.२४/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ११६**

पुणे महानगरपालिके तर्फे समाज विकास विभागा मार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत तरी सन २०१७–१८ या आर्थिक वर्षापासून इ.१० वी साठी शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सरसकट र.रुपये ५०००/– इतके अनुदान देण्याबाबत मा .सौ. राणी रायबा भोसले ,अध्यक्षा, महिला व बाल कल्याण समिती व मा.सौ.मुक्ता जगताप यांचे दि.१०.१.२०१८ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १६९ दि.१०/१/२०१८ ला अनुसरुन झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २००९ दि.२३/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/सविवि/१३९७ दि.३१/३/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.२४/४/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**